भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०२/२०१७

**१) जनरल स्टोअर्सचे लोखंडी चॅनल गेटचा कुलुप तोडुन दुकानातील सामानाची चोरी . :-**

दिनांक ०७/०२/२०१७ चे २०.४५ ते ०८/०२/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान. यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी प्रमोद हरिभाऊजी बावनकर वय ५१ वर्ष रा. भाईतलाव वार्ड पवनी यांचे जनरल स्टोर्सचे दुसऱ्या मजल्यावरील लोंखडी चॅनल गेटचा कुलुप तोडुन आत प्रवेश करून दुकानातील ०२ डब्यातील ५ रू. व १० रूपयाचे कॉईन अंदाजे १०,०००/–रू., २ सॅमसंग कंपनीचे मोबाईल किं.२०००/–रू., ३ सॅनडीक कं. पेन डाईव्ह किं. ९००/–रू., १० रूपयाच्या १०० नोटा १०००/–रू. असा एकुण १३,९००/–रू. माल सुनामौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) रस्तात स्वीप्ट गाडी अडवुन शिवीगाळ करुन लाकडी काठीने मारहान करुन सामान व नगदी पैसे घेवुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :-**

दिंनाक ०८/०२/२०१७ रोजी १०.३० ते १२.२६ वा. दर. यातील आरोपी हे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी/कर्मचारी असुन यातील सातही आरोपीतांनी फिर्यादी व फिर्यादीचा मित्र मंगेश यांची स्वीप्ट गाडी क्र. एमएच ३६ एच ६७७७ ने जात असतांना रस्त्यात अडवुन दारु सप्लाय करण्याचे संशयावरुन शिवीगाळ करुन लाकडी काठीने मारहान केली. तसेच फिर्यादी व त्याचा मित्र यास गैरपने ताब्यात घेवुन जबरदस्तीने ब्रम्हपुरीला घेवुन जात असतांना फिर्यादी हा त्याचे ताब्यातुन पळाला असता आरोपीने फिर्यादीची मारोती स्वीप्ट गाडी क्र. एमएच ३६ एच ६७७७ किंमती २,००,०००/–रु. सॅमसंग कंपनीचे दोन मोबाईल किंमती १०,०००/–रु., नगदी ५०,०००/–रु. कपडे असलेली बॅग किंमती ३,०००/–रु. असा एकुण २,६३,०००/–रु. चा माल जबरदस्तीने घेवुन निघुन गेल्याने फिर्यादी तिलक रामदास वैद्य वय २९ वर्ष, रा. मागली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी कलम ३९५,३६३,३४१,३४२,५०४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो. स्टे. पवनी हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**३) संगनमत करुन शासकीय वाहन अडवुन शिवीगाळ करुन हाताबुक्यांनी मारहान केली शासकीय वाहनाची तोडफोड केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिंनाक ०८/०२/२०१७ रोजी १२.०० वा. दर. यातील फिर्यादी पोलीस निरीक्षक सुनिल सदाशिव गुजर वय ५७ वर्ष, रा. प्लाट क्र. १९ गोडेश्वर लेआऊट नागपुर हे आपल्या इतर सहकार्यासह कायदेशीर त्याचे सरकारी कर्तव्यावर हजर असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे शासकीय वाहन अडवुन फिर्यादीस तसेच त्यांचे सहकार्याना शिवीगाळ करुन हाताबुक्यांनी मारहान करुन व त्याचे खिशातील सॅमसंग कंपनीचे दोन मोबाईल किंमती १०,०००/–रु., जिवोनी कंपनीचा १ मोबाईल किंमती १२,०००/–रु. असा एकुण २२,०००/–रु. चा माल जबरदस्तीने हिसकावुन व शासकीय वाहनाची तोडफोड करुन अंदाजे १०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी तिलक रामदास वैद्य वय २९ वर्ष, रा. मागली यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी कलम ३९५,३५३,३३२,३४१,५०४ भांदवी. सहकलम ४ महाराष्ट्र सार्वजनीक प्रतीबंधक कायदा १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो. स्टे. पवनी हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी . :-**

दिनांक ०८/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, वरठी, तुमसर, सिहोरा, आंधळगाव, गोबरवाही, साकोली, लाखनी, पालांदुर व लाखांदुर येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ९७ हातभट्टी दारु किंमती ६,८५०/–रु. व ७ लिटर ५६० मिली लिटर देशी दारु किंमती २,२३०/–रु. व तसेच जुगारातुन किंमती ५०९२ रु–/ असा एकुण किंमती १४,१६२/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

PSI

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान-पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.